




सायं दैनिक

# नांदेड वार्ता

www.nandedwarta.com

• वर्ष २४ वे • अंक २४१ • मंगळवार दि.२३ जून २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना क्र.जी.-२/आरएनपी/एनएनडी-२६२/२०२३-२०२५ • पाने ४ • किंमत १ रु.


# झोपेचे सोंग घेणाऱ्या सरकारला जागे करण्यासाठी काँग्रेस आंदोलन करणार-हर्षवर्धन सपकाळ

## काँग्रेसचा जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य आसुड मोर्चा



नांदेड/प्रतिनिधी-केंद्रातील व राज्यातील भाजप सरकार शेतकरी, शेतमजूर व कामगार विरोधी आहे. सरकारच्या जनविरोधी धोरणाविरुद्ध व झोपेतून जागे करण्यासाठी काँग्रेस रस्त्यावर उतरुन संघर्ष करेल, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिला आहे.

नांदेड जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने भाजप सरकारच्या सर्वसामान्य जनतेच्या धोरणा विरुद्ध आसुड मोर्चा आज (मंगळवार) दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात आला होता. जिल्हा व शहर काँग्रेस कार्यालयातील या आसूड मोर्चाची सुरुवात झाली तर तत्पूर्वी मोर्चाला संबोधित करताना हर्षवर्धन सपकाळ यांनी केंद्र व राज्य सरकारवर घनाघाती टीका केली. शेतकऱ्यांच्या मालाला हमीभाव नाही, बेरोजगारांच्या हाताला काम नाही, महिला सुरक्षित नाहीत, शेतकऱ्यांना खोटे आश्वासने देऊन बड्या उद्योजकांना कर्जमाफी दिली जाते परंतु देशात दररोज शेतकऱ्यांच्या आत्महत्या होत असतानाही शेतकऱ्यांची कर्जमाफी दिली जात नाही, अशी सडकून टीका सपकाळ यांनी केली.देशाचे अर्थशास्त्र उलट्या दिशेने फिरत आहे पेट्रोल डिझेल व गॅस सिलेंडरच्या किमती प्रचंड वाढल्याने सर्वसामान्य नागरिकांना महागाईचा सामना करावा लागत आहे. तेल तसेच सर्व प्रकारच्या डाळी महागले आहेत असे असताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अदानी आणि अंबानी सह इतर सर्व उद्योजकांचे कर्ज माफ केले आहे. देशातील नागरिकांना बचत करण्याचे व विदेश यात्रा न करण्याचे आवाहन करणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी मात्र विदेश यात्रा काही सोडत नाहीत असाही घनाघात त्यांनी केला. देशात फोडाफोडीचे राजकारण सुरू आहे. भविष्यात वन नेशन वन इलेक्शन,वन पार्टी' अशी वाटचाल सुरू आहे. काही मूठभर लोकांच्या हाती राजसत्ता आणि धर्म सत्ता देण्याचे प्रयत्न सुरू आहेत ही बाब अत्यंत चिंताजनक असल्याचे सपकाळ यांनी नमूद केले. सत्ताधाऱ्यांकडून दडपशाहीचे राजकारण सुरू आहे. नांदेडची अवस्था अत्यंत बकाल झाली असून नागरिकांना चार दिवस आड पाणी मिळत आहे. जागोजागी रस्ते खोदून ठेवले आहेत. विकासाचा पत्ता नाही. अशी टीका खासदार रवींद्र चव्हाण यांनी यावेळी केली. विधान परिषद निवडणुकीत काँग्रेसचे रामदास पाटील सुमठाणकर यांनी मोठ्या मनाने उमेदवारी अर्ज मागे घेतला परंतु ऐनवेळी महाविकास आघाडीचे खासदार फुटले. आता यापुढे सर्व निवडणुका स्वबळावर लढण्यास काँग्रेस सक्षम आहे त्यासाठी पक्षश्रेष्ठींनी आम्हाला बळ द्यावे, अशी विनंती खा.रवींद्र चव्हाण यांनी सपकाळ यांना केली.

यावेळी जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे शहराध्यक्ष अब्दुल गफार, माजी आ.हाणमंत पाटील बेटमोगरेकर, ज्येष्ठ नेते सुरेश गायकवाड, राजेश पावडे, अब्दुल सत्तार, डॉ.यशपाल भिंगे, श्रावण रेपनवाड, डॉ.रेखा चव्हाण, रामदास पाटील सुमठाणकर, सुरेंद्र घोडजकर, महेश देशमुख, तिरुपती कोंडेकर, नगरसेवक मुन्ना अब्बास, शंकर शिंदे, एकनाथ मोरे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. यावेळी नांदेड दक्षिणचे पान ४ वर

## बंडखोर खासदारांच्या ताफ्यासमोर ठाकरे सेनेच्या कार्यकर्त्यांचे आंदोलन




नांदेड/प्रतिनिधी-शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाशी गद्दारी करुन शिंदे सेनेत प्रवेश करणाऱ्या खासदारांच्या ताफ्यासमोर सोमवारी रात्री ठाकरे सेनेच्या कार्यकर्त्यांनी गद्दारीचे बॅनर व पोस्टर लावून आंदोलन केले. आंदोलन करणाऱ्या शिवसैनिकांना पोलीसांनी अटक केली आहे.

शिवसेना उबाठा पक्षाशी बेईमानी करुन खा.नागेश पाटील आष्टीकर, खा.सुरेश उर्फ बंडू जाधव, खा.ओमप्रकाश राजे निंबाळकर, खा.सुरेश देशमुख, खा. संजय दिना पाटील, खा. भाऊसाहेब वाघचौरे यांनी सोमवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला. हा प्रवेश सोहळा मुंबईत संपन्न झाला. पक्षाशी गद्दारी करणाऱ्या खासदारांविषयी मतदारसंघातील जनतेमध्ये व ठाकरे सेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये तीव्र संताप पसरला आहे. सोमवारी रात्री मतदार संघात परत जाण्यासाठी मुंबईहून विशेष विमानाने खा.नागेश पाटील आष्टीकर, खा.सुरेश जाधव, खा.सुरेश देशमुख यांचे नांदेड विमानतळावर आगमन झाले. बंडखोर खासदारांच्या स्वागतासाठी त्यांच्या समर्थकांनी नांदेड पान ४ वर

## मुदतबाह्य गोळ्या विकणाऱ्या तोष्णीवाल मेडिकलचा परवाना रद्द

नांदेड/प्रतिनिधी-मुदतबाह्य झालेल्या गोळ्यांची विक्री करणाऱ्या शहरातील प्रतिष्ठित तोष्णीवाल मेडिकल स्टोअर्सचा परवाना रद्द करण्यात आला आहे. या कारवाईमुळे जिल्ह्यातील मेडिकल चालकांचे धाबे दणाणले आहेत.

नायगाव तालुक्यातील हनुमंत वनाळेकर हे आपल्या ९० वर्षीय वडिलांसाठी डायबिटीसच्या गोळ्या घेण्यासाठी डॉक्टरलेन येथे पोहोचले. तोष्णीवाल मेडिकलवरून त्यांनी डायबिटीसच्या गोळ्यांचे तीन पाकिटे खरेदी केले. घरी गेल्यानंतर हनुमंत वनाळेकर यांच्या मुलीला गोळ्यांची मुदत डिसेंबर २०२५ रोजी संपल्याचं निदर्शनास आलं. ही बाब समजल्यानंतर मुलगा हनुमंत वनाळेकर यांनी थेट तुकाराम मुंडे यांना ई-मेल करुन तक्रार केली. तक्रारीनंतर मुंढे यांनी नांदेडच्या अन्न औषध प्रशासनच्या अधिकाऱ्यांना कारवाईचे आदेश दिले. त्यानंतर संबंधित तक्रारदारासह अन्न आणि औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त अशोक राठोड हे मेडिकलवर पोहोचले. अधिकाऱ्याने मेडिकल चालकाकडून डायबिटीसच्या गोळ्या मागितल्या असता मेडिकलचालकाने त्यांना मुदतबाह्य गोळ्यांची स्ट्रिप दिली. दोन तासाच्या चौकशीनंतर मेडिकल बंद ठेवण्याचे आदेश संबंधित विभागाने दिले. अहवाल प्राप्त झाल्यानंतर सोमवारी मेडिकलचा परवाना रद्द करण्यात आल्याची माहिती अन्न आणि औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त अशोक राठोड यांनी दिली आहे.

## एसटी कर्मचाऱ्यांच्या भत्त्यात मोठी वाढ

### परिवहन मंत्री सरनाईक यांची घोषणा



मुंबई/प्रतिनिधी-राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) ८६ हजार कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्ता आणि घरभाडे भत्त्यात वाढ करण्याची घोषणा करण्यात आली आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी मंगळवारी विधान-सभेत याबाबतची घोषणा केली.

सरकारी कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर एसटी कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता ५३ टक्क्यांवरून वाढवून ५८ टक्के करण्यात आला आहे. तसेच, घरभाडे भत्त्यातही वाढ करण्यात आली असून, यापूर्वी मिळणारा ८, १६ आणि २४ टक्के भत्ता वाढवून अनुक्रमे १०, २० आणि ३० टक्के करण्यात आला आहे. कर्मचाऱ्यांचा वार्षिक वेतनवाढीचा दरही २ टक्क्यांवरून ३ टक्के करण्यात आला आहे.एसटी कर्मचाऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी संघटनांकडून आंदोलनाची हाक देण्यात आली होती. मात्र, आंदोलन सुरू होण्यापूर्वीच सरकारने वेतनवाढीची घोषणा करून कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा दिला आहे.विधानसभेत निवेदन करताना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक म्हणाले की, एसटी महामंडळातील सर्व कामगार संघटनांच्या प्रतिनिधींशी चर्चा करण्यात आली असून राज्याच्या कानाकोपऱ्यात सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या न्याय्य मागण्यांचा सकारात्मक विचार करण्यात आला आहे.महागाई भत्ता, घरभाडेभत्ता आणि वार्षिक वेतनवाढीतील वाढीमुळे एसटी कर्मचाऱ्यांच्या पगारात लक्षणीय वाढ होणार असून या निर्णयाचे कर्मचाऱ्यांच्या संघटनांकडून स्वागत करण्यात येत आहे.

## मान्सून राज्यासह मराठवाड्यात २४ जूनपासून सक्रीय

### हवामान खात्याचा अंदाज



मुंबई/प्रतिनिधी-गेल्या पंधरा दिवसांपासून रेंगाळलेल्या नैऋत्य मोसमी वाऱ्यांना अखेर वेग मिळण्याची चिन्हे दिसू लागली असून, २४ जूनपासून राज्यातील बहुतांश भागात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता भारतीय हवामान विभागाने व्यक्त केली आहे. पुण्यात मान्सूनचे आगमन झाल्याची घोषणा करण्यात आली असून, पुढील ४८ तासांत मान्सून मुंबईत दाखल होण्याचा अंदाज वर्तविण्यात आला आहे.

एल निनोचा प्रभाव, कोरडी हवा आणि कमी दाबाच्या क्षेत्रांचा अभाव यामुळे यंदा मान्सूनची प्रगती संथ झाली होती. त्यामुळे राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाची प्रतीक्षा लांबली होती. मात्र, आता हवामान प्रणाली उत्तर किनारपट्टी आणि राज्याच्या अंतर्गत भागांकडे सरकत असल्याने पावसासाठी अनुकूल वातावरण निर्माण झाले आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २४ ते २८ जून या कालावधीत कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा तसेच विदर्भातील अनेक जिल्ह्यांत पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. हवामान तज्ज्ञ कृष्णानंद होसाळीकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, दक्षिण कोकणासह राज्यातील विविध भागांत मान्सून सक्रिय होण्यासाठी पोषक परिस्थिती तयार झाली आहे. गेल्या काही दिवसांत सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि पुणे जिल्ह्यांमध्ये मान्सूनने प्रगती केली आहे. पुढील दोन दिवसांत मुंबईसह उर्वरित भागांमध्येही मान्सून सक्रिय होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. मान्सूनच्या विलंबामुळे राज्यातील अनेक भागांमध्ये उष्णतेची लाट, पाण्याची टंचाई आणि शेतीच्या कामांमध्ये अडथळे निर्माण पान ४ वर




# विनाशाच्या उंबरठ्यावर जग

**मानवी संस्कृतीने विसाव्या शतकात दोन महायुद्धांचा भयानक थरार अनुभवला आणि त्यातून धडा घेत संयुक्त राष्ट्रांसारख्या जागतिक संघटनांची स्थापना केली. उद्देश एकच होता, पुन्हा कधीही जगावर युद्धाची काळी सावली पडू नये आणि मानवी संहार थांबवावा. परंतु, आज एकविसाव्या शतकाच्या तिसऱ्या दशकात जागतिक परिस्थिती पाहिल्यास असे वाटते की, जगातील बलाढ्य आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम देशांनी इतिहासातून काहीच धडा घेतलेला नाही. एका युद्धाची ठिणगी विझत नाही तोच दुसरीकडे विनाशाचा वणवा पेटत आहे. युद्धखोरीच्या या दुष्टचक्रात संपूर्ण जग आणि विशेषतः विकसनशील देश होरपळून निघत असून, आता जागतिक शांततेसाठी 'युद्ध नव्हे,तर बुद्ध' हाच एकमेव मार्ग उरला आहे, हे जगाला कधी समजणार?, हाच आजचा सर्वात मोठा प्रश्न आहे.गेल्या तीन-साडेतीन महिन्यांपासून अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या भीषण संघर्षामुळे संपूर्ण जगाला याचे अत्यंत गंभीर आणि दूरगामी परिणाम भोगावे लागले. हा संघर्ष केवळ दोन देशांच्या सीमांपुरता मर्यादित नव्हता, तर त्याचा थेट फटका भारतासारख्या विकसनशील देशांना आणि तिथल्या सामान्य नागरिकांना बसला. जागतिक बाजारातील खनिज तेलाचा पुरवठा विस्कळीत झाल्यामुळे भारतात पेट्रोल, डिझेल आणि स्वयंपाकाच्या गॅसच्या किमती गगनाला भिडल्या. महागाईचा भस्मासूर एवढा वाढला की, सामान्य जनतेचे दैनंदिन बजेट कोलमडले आणि जगणे असह्य झाले. या संघर्षादरम्यान अनेकदा पडद्यामागून आणि उघडपणे शांतता चर्चा झाल्या. प्रत्येक वेळी जगाला वाटायचे की आता शांतता प्रस्थापित होईल आणि परिस्थिती पूर्वपदावर येईल, पण दुसऱ्याच क्षणाला पुन्हा बॉम्बस्फोट आणि क्षेपणास्त्रांच्या हल्ल्यांनी जग हादरून जायचे. दोन दिवसांपूर्वीच जेव्हा दोन्ही देशांनी सामंजस्य करार करून युद्धविरामाची घोषणा केली, तेव्हा संपूर्ण जगाने सुटकेचा श्वास सोडला होता, बाजारपेठा स्थिर होऊ लागल्या होत्या आणि शांततेची आशा पल्लवित झाली होती.परंतु, अमेरिका-इराण युद्धाची आग शांत होऊन ४८ तास उलटत नाही, तोच रशिया आणि युक्रेन यांनी पुन्हा एकमेकांवर प्राणघातक आणि भीषण हल्ले सुरू केले आहेत. रशिया-युक्रेन संघर्षाची पार्श्वभूमी जगाला माहीत आहे. यापूर्वी झालेल्या दीर्घकाळ युद्धामुळे जागतिक अन्नसुरक्षा, खतांचा पुरवठा आणि जागतिक अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली होती. कोट्यवधी निष्पाप नागरिकांना विस्थापित व्हावे लागले होते. ते युद्ध कसेबसे शांत झाले आणि काही दिवस उलटत नाही, तोच अमेरिका-इराणमध्ये युद्ध पेटले होते. आता तिथून जगाची सुटका झाली असे वाटत असतानाच पुन्हा रशिया-युक्रेनने हिंसक वळण घेतले आहे. हा सुरू असलेला उलटा फेरा अत्यंत चिंताजनक आणि भीतीदायक आहे. जागतिक सत्ता आणि भू-राजकीय वर्चस्व राखण्याच्या या आंधळ्या शर्यतीत महासत्तांनी संपूर्ण जगाला आणि पर्यायाने मानवतेला ओलीस ठेवले आहे.या संपूर्ण चक्रात सर्वात मोठी शोकांतिका ही आहे की, युद्धाची घोषणा करणारे आणि ते लढणारे देश आर्थिकदृष्ट्या अत्यंत सक्षम आहेत. अमेरिका, रशिया किंवा युरोपीय देशांकडे संपत्ती, तंत्रज्ञान आणि संसाधनांची कमतरता नाही. परंतु, या युद्धाची खरी आणि मोठी किंमत आशिया, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील विकसनशील व गरीब देशांना मोजावी लागते. कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या की वाहतूक खर्च वाढतो, ज्यामुळे अन्न-धान्यापासून ते औषधांपर्यंत सर्वच जीवनावश्यक गोष्टी महाग होतात. यामुळे परकीय चलनाचे साठे रिकामे होतात आणि देशांतर्गत विकासाचे प्रकल्प ठप्प पडतात. युद्धांमुळे निर्माण होणारी गरिबी, बेरोजगारी आणि उपासमार ही कोणत्याही महामारीपेक्षा भयंकर असते. सामर्थ्यवान देशांच्या अहंकारापायी भारतासारख्या देशातील मध्यमवर्गीय आणि गरीब नागरिकांना आपल्या हक्काच्या पैशातून ही लादलेली महागाई सोसावी लागत आहे, हा कुठला न्याय म्हणावा? अशा या अत्यंत संवेदनशील आणि स्फोटक परिस्थितीत जगातील सर्वच देशांनी, विशेषतः अमेरिका, रशिया, इराण आणि युक्रेन या महासत्तांनी आता आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. त्यांना खरंच विनाशाचे 'युद्ध' हवे आहे की शांततेचा 'बुद्ध' हवा आहे, याचा निर्णय घ्यावा लागेल. अडीच हजार वर्षांपूर्वी भारताच्या भूमीवरून भगवान गौतम बुद्धांनी संपूर्ण जगाला शांतता, संयम, करुणा आणि अहिंसेचा वैश्विक संदेश दिला होता. बुद्धांनी सांगितले होते की, द्वेषाने द्वेष कधीच संपत नाही, तो केवळ प्रेमाने आणि शांततेनेच संपू शकतो. आजच्या अणुबॉम्बच्या युगात हा संदेश अधिक प्रासंगिक ठरतो. जर जगाने बुद्धांचा हा विचार स्वीकारला नाही, तर मानवी संस्कृती नष्ट व्हायला वेळ लागणार नाही.युद्ध हे कोणत्याही समस्येचे अंतिम उत्तर असू शकत नाही, हे इतिहास सांगतो. संवादाने आणि सामंजस्याने सर्वात मोठे वाद मिटवता येतात, हे अमेरिका-इराणच्या दोन दिवसांपूर्वीच्या करारावरून पुन्हा एकदा सिद्ध झाले होते. मग तोच मार्ग रशिया आणि युक्रेन का निवडू शकत नाहीत? जागतिक संघटनांनी आता केवळ मूकदर्शक न राहता, या युद्धखोर प्रवृत्तींना वेळीच लगाम घातला पाहिजे. महासत्तांनी आपल्या रक्ताळलेल्या तलवारी म्यान करून, बुद्धाच्या शांततेच्या मार्गावर चालणे ही आजच्या काळाची सर्वात मोठी गरज आहे. जगाला विनाशापासून वाचवायचे असेल, तर युद्धाची खुमखुमी सोडून बुद्धाचा शांतता मार्ग स्वीकारण्यावाचून दुसरा कोणताही पर्याय नाही.**

# मृत्यूनंतर उपयुक्त व्हायचे आहे,तर देहदान करावे



(मागील अंकावरुन)

आजाराने मृत्यू पावलेल्या व्यक्तीचे शरीर दान केले गेल्यास, त्या रोगाचे स्वरूप खोलवर समजून घेऊन उपचार शोधण्याची दिशा मिळते.पर्यावरणपूरक दृष्टिकोनही यात दडलेला आहे. एका मृतदेहाच्या दहनासाठी सरासरी एक मोठा वृक्ष जाळला जातो आणि धुराचे प्रचंड प्रदूषण होते. शरीरदानामुळे हे पर्यावरणीय नुकसान टाळले जाते. मात्र, या सर्व ज्ञान आणि योगदानाच्या प्रवासात एक मोठा अडथळा म्हणजे सामाजिक अंधश्रद्धा आणि गैरसमज.

मृत्यूनंतर शरीर अबाधित राहिले पाहिजे, नाहीतर आत्म्याला मुक्ती मिळत नाही, देह कापला तर पुढच्या जन्मी विकलांगता येते, अशा रूढ समजुती समाजात खोलवर रुजलेल्या आहेत. परंतु, कोणताही धर्म मानवसेवेला विरोध करत नाही; हिंदू, मुस्लिम, शीख, बौद्ध, जैन सर्वच धर्मांमध्ये परोपकार हाच सर्वोच्च धर्म मानला गेला आहे. शरीरदान हे तर अंतिम परोपकाराचे कृत्य आहे. या अडथळ्यांवर मात करण्यासाठी शाळा-महाविद्यालयांतून जनजागृती, सोशल मीडियाचा सकारात्मक वापर, शिबिरे आणि यशस्वी देहदात्यांच्या कुटुंबांचे अनुभव कथन यांची नितांत आवश्यकता आहे. शरीरदान म्हणजे 'देहदान' नव्हे, तर ते 'ज्ञानदान' आहे, ही भावना समाजमनावर बिंबवली पाहिजे.या सगळ्या विवादाच्या पार्श्वभूमीवर, देहदान चळवळीतील प्रेरणादायी कार्य आणि व्यक्तिरेखा यांच्याकडे लक्ष वेधणे अधिक महत्त्वाचे ठरते. मुंबईत 'ज्येष्ठ स्थानिक नागरिक सेवा मंच' आणि समाजसेविका सविता घरत गेल्या १५ वर्षांपासून अविश्रांतपणे ही चळवळ चालवत आहेत. त्यांच्या कार्याचे ब्रीदवाक्य आहे मरावे परी कीर्ती रूपे उरावे, का नाही मरावे परी देहदान, अवयवदान रूपी उरावे. सविता घरत, रश्मी परब आणि त्यांच्या सहकारिणी घरोघरी जाऊन, शिबिरे भरवून, ऑनलाइन मार्गदर्शन करून लोकांमधील भीती आणि अडथळे दूर करत आहेत.

नुकतेच त्यांनी ९० वर्षीय श्री. आर. के. सहगल यांची भेट घेतली. सहगल साहेब, जे स्वतः अभियंता असून मेलबर्न विद्यापीठाचे पदवीधर आहेत, ते गेली दोन वर्षे संस्थेच्या प्रतीक्षेत होते. त्यांची ९० वर्षांची पत्नी आणि ते मुलं परदेशात असूनही स्वतःच्या इच्छेने भारतात राहतात. त्यांच्या लहान मुलाला न्यू जर्सीहून खास बोलावून, सर्व कायदेशीर बाबींवर चर्चा करून, सविता घरत यांनी त्यांचा देहदान आणि अवयवदानाचा मार्ग सुकर केला. सहगल साहेबांचे ते वाक्य मनाला भिडते आयुष्यभर प्रामाणिकपणे जगलो, सगळं चांगलंच झालं. पण आता शेवटच्या क्षणीही मला समाजाला काहीतरी देऊनच जायचं आहे. त्यात कोणतेही विघ्न येऊ नये म्हणून आधीच ही तजवीज प्रत्येकाने केली पाहिजे. अशी माणसे म्हणजे चालती-बोलती प्रेरणास्रोत आहेत. त्याचप्रमाणे, १९८८ पासून कार्यरत असलेल्या डोंबिवलीच्या 'महर्षी दधीचि देहदान मंडळा'चे कार्यही अविस्मरणीय आहे. गुरुदासजी तांबे यांनी एका व्याख्यानाने प्रभावित होऊन मित्रांच्या मदतीने ही संस्था स्थापन केली. ही संस्था देहदानासोबतच नेत्रदान, त्वचादान, रक्तदान आणि अवयवदान यांचाही विनामूल्य प्रचार करते. त्वचा दान केल्यास भाजलेल्या रुग्णांवर त्वचारोपण करता येते; नेत्रदानाने चार ते सहा अंध व्यक्तींना दृष्टी मिळू शकते, या साऱ्या माहितीचा ते अविरत प्रसार करत आहेत.

या चळवळीचा खरा आत्मा समजून घ्यायचा असेल, तर प्रत्यक्ष कार्यकर्त्यांचे अनुभव ऐकावे लागतील. परभणीचे विनोद डावरे, ज्यांनी २०१५ साली आपल्या नानांचे (वडिलांचे) देहदान केले, ते सांगतात, माझा एक डॉक्टर मित्र ३५ वर्षांनी भेटला आणि म्हणाला, 'तुझ्या वडिलांच्या देहदानामुळेच मी आज हा डॉक्टर आहे. आमची इमारत फक्त त्या देहावर विसंबून आहे. आम्ही त्या देहासोबत गप्पा मारतो, एक नातं तयार होतं. आणि सगळं शिक्षण झाल्यावर अत्यंत हायजेनिक पद्धतीने आम्ही त्यांचा अंत्यविधी करतो.' हे ऐकून त्यांच्या मनावरचे सारे दडपण उतरले आणि ते स्वतः या क्षेत्रात सक्रिय झाले. आजवर त्यांनी आपल्या वैयक्तिक प्रयत्नांतून १४ देहदाने आणि ३० अवयवदाने घडवून आणली आहेतयाचा त्यांना शून्य आर्थिक लाभ आहे, पण सामाजिक बांधिलकी म्हणून ते हे कार्य करत आहेत. ते विचारतात, एका शासकीय मेडिकल कॉलेजमध्ये ७५ विद्यार्थी एका देहाभोवती स्टूलवर उभे राहून शरीरशास्त्र शिकत आहेत. उद्या हेच विद्यार्थी तुमच्यावर उपचार करणार असतील, तर या शिक्षणाची गुणवत्ता काय असेल? हा प्रश्न आपल्या सगळ्यांनाच विचार करायला लावणारा आहे. म्हणूनच, शरीरदान हा केवळ एक पर्याय नसून, ती काळाची गरज आहे. खुद्द एका डॉक्टर मित्राने एका देहदात्याच्या कुटुंबीयाला सांगितले होते, आम्हा डॉक्टरांना जगात आई-वडिलांनंतर सर्वांत सन्माननीय व्यक्ती म्हणून वाटत असेल तर तो फक्त हा देहदाताच आहे.

आमची संपूर्ण वैद्यकीय इमारत या देहावरच उभी आहे. आम्ही शवविच्छेदन करता-करता लंचब्रेकमध्ये हात धुऊन जेवतो आणि लगेच पुन्हा त्याच देहाशी एका आपुलकीच्या नात्याने जोडले जातो. इतके की आम्ही त्या देहाशी गप्पाही मारतो. वैद्यकीय अभ्यास संपल्यानंतर त्या देहाच्या अवशेषांची कोणत्याही टाकाऊ वस्तूप्रमाणे विल्हेवाट न लावता, अत्यंत सन्मानपूर्वक, धार्मिक परंपरेनुसार किंवा कुटुंबीयांच्या इच्छेनुसार अंत्यसंस्कार केले जातात. काही संस्था अस्थी कुटुंबीयांना परत करतात, तर काही सामूहिक विसर्जन करतात. या सर्व प्रक्रियेत पारदर्शकता आणि आदर हा अढळ नियम आहे. डॉ. आशा कदम यांनी आपल्या अनुभवातून सांगितले की, आजही पोस्टमॉर्टेम करताना त्या देहाची पुरेपूर काळजी आम्ही डॉक्टर व शिपाई लोक घेतो. मृतदेहाची डिग्निटी राखलीच पाहिजे हा अलिखित नियम सगळे पाळतात. ही सन्मानाची परंपरा हजारो वर्षांपासून भारतीय संस्कृतीत रुजलेली आहे; महर्षी दधीचि यांनी तिन्ही लोकांच्या शांततेसाठी स्वतःची अस्थी दान केली आणि ते सृष्टीतील पहिले देहदाता म्हणून ओळखले जातात.

या संपूर्ण चर्चेतून एक गोष्ट अत्यंत स्पष्टपणे समोर येते शरीरदान ही चळवळ केवळ मृतदेहाच्या उपयोजनापुरती मर्यादित नाही. ती मानवी जीवनाचे श्रेष्ठत्व, परोपकाराची परमावधी आणि ज्ञानदानाची अखंड परंपरा यांचे मूर्त स्वरूप आहे. डॉ. आनंदीबाई जोशी, डॉ. द्वारकानाथ कोटणीस, डॉ. किशोर शांताबाई काळे, डॉ. नीतू मांडके, डॉ. रवी बापट, डॉ. प्रकाश-मंदा आमटे, डॉ. तात्याराव लहाने अशा कितीतरी वैद्यकीय दिग्गजांची मांदियाळी महाराष्ट्राने पाहिली आहे, ज्यांनी आपले आयुष्य मानवसेवेसाठी वेचले. हीच ती डॉक्टरांची खरी परंपरा. एका गॅरेजमधील मेकॅनिक सकाळी आपल्या अवजारांना नमस्कार करतो, व्यापारी चोपडीची पूजा करतोही आपल्या व्यवसायाप्रती कृतज्ञता असते. तशीच भावना एका आदर्श डॉक्टरची त्याच्या रुग्णांप्रती आणि शिक्षणाचे साधन बनलेल्या शरीरदात्याप्रती असायला हवी. अंजली झरकर यांनी म्हटल्याप्रमाणे, जो धडधाकट माणूस डॉक्टरकडे जाणारच नाही; ज्याच्या शरीरात प्रॉब्लेम आहे तोच जातो, कारण त्याच्यासाठी डॉक्टर हा देव असतो. अशा जिवंत किंवा मृत शरीराची विटंबना करणाऱ्या नीच डॉक्टरांमुळे, एका कसायाच्या आणि डॉक्टरच्या मानसिकतेत काय फरक राहतो? हा सवाल समाजाने गांभीर्याने घेण्याची वेळ आली आहे.



कल्पना पांडे

पॉप्युलर सायन्स मध्ये लिहिणाऱ्या ब्रूक बोरेल आपल्या एका लिखाणात लिहितात-परदेशात विज्ञान, सुरक्षा आणि शिक्षण आणि संशोधनात मृतदेहांचा उपयोग केला जातो. संशोधनाच्या अनेक क्षेत्रांसाठी मृतदेहांची आवश्यकता असते. उदाहरणार्थ, दुखापतीच्या बायोमेकॅनिक्सचा अभ्यास करणारे शास्त्रज्ञ मानवी शरीराला कसे दुखापत होते हे समजून घेऊ इच्छितात. यामुळे ते दुखापतींना प्रतिबंध करण्यास मदत करू शकतात. यासाठी, ते मृतदेह किती आघात सहन करू शकतो हे समजून घेण्यासाठी नियंत्रित चाचण्या आयोजित करतात. या चाचण्यांमधून मिळालेली मोजमापे एका मॉडेल किंवा डमीवर लागू केल्यानंतर, शास्त्रज्ञ आपल्याला सुरक्षित ठेवणाऱ्या संरक्षक गियरची (उदा. हेल्मेट, सीट बेल्ट) चाचणी आणि परिपूर्णता तपासतात. अस्सल शरीराचा वापर कारमधील सीट बेल्ट किंवा ट्रेनमधील आसन अधिक सुरक्षित करण्यास मदत करू शकते. मेंदू अशी हेल्मेट्स डिझाइन करण्यास मदत करू शकतो ज्यामुळे अमेरिकन फुटबॉल खेळाडूंना कठोर टॅकलमध्ये होणाऱ्या मेंदूच्या आघातजन्य दुखापती कमी होतील. तसेच, सैनिकाला बॉम्ब स्फोटाच्या धक्क्यामुळे होणारी दुखापत कमी करण्यासाठीही याचा उपयोग होऊ शकतो. जेव्हा हे संशोधन पूर्ण होते, तेव्हा कुटुंबाला इच्छा असल्यास, माझे दाह केलेले अवशेष घेता येतात. अन्यथा, दान दात्याला इतर दावा न केलेल्या दात्यांसोबत एका स्मारक फलकाद्वारे, झाडाद्वारे किंवा गंभीर वार्षिक समारंभाद्वारे सन्मानित केले जाऊ शकते.फोरेन्सिक शास्त्रज्ञ देखील त्यांच्या कामात मृतदेह वापरतात. काही विद्यापीठे दान केलेली शरीरे घेतात आणि त्यांना जमिनीत रोवतात किंवा एका निर्जन जंगलात ठेवतात.

मग शास्त्रज्ञ वेळ मोजतात की माशा, डर्मेस्टिड बीटल्स आणि इतर कचरा खाणारे कीटक शरीरांना हाडे करण्यासाठी किती वेळ लागतो. हा एक प्रकारचा भिन्न पुनर्जन्म आहे, एका शेताच्या किंवा जंगलाच्या परिसंस्थेचा भाग बनणे. हा अंत भयावह वाटू शकतो, परंतु या प्रक्रियेतून मिळालेला डेटा फोरेन्सिक संशोधकांना एखादी व्यक्ती कधी मरण पावली आणि त्यांना कोणत्या दुखापती झाल्या असाव्यात हे ओळखण्यास मदत करतो. यामुळे कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या अधिकाऱ्यांना खुनाची प्रकरणे सोडवण्यास मदत होते.अशा प्रक्रियेत शरीर एखाद्या विशिष्ट गुन्ह्याच्या उदाहरणार्थ-जंगलात टांगलेले, किंवा कारच्या ट्रंकमध्ये भरलेले वगैरे दृश्याची पुनर्निर्मिती करण्यासाठी वापरले जाऊ शकते. यामुळे प्रकरण सोडवण्यास किंवा एखाद्या पोलिसाला खुनीला न्यायाच्या कक्षेत आणण्यास मदत होऊ शकते. नंतर, सांगाडा फोरेन्सिक संग्रहात एका बॉक्समध्ये विश्रांती घेऊ शकतो, अधूनमधून हाडांच्या वृद्धत्वावरील संशोधनाच्या रूपात जिवंत राहू शकतो.परंतु संपूर्ण शरीरदानासाठी आणखी एक पर्याय आहे, जो वैद्यकीय प्रशिक्षणातील एक प्रदीर्घ परंपरा आहे आणि माझ्यासाठी अधिक योग्य वाटतो. प्रत्येक पहिल्या वर्षाच्या वैद्यकीय विद्यार्थ्याला 'ग्रॉस एनाटॉमी' नावाचा अभ्यासक्रम घ्यावा लागतो, ज्यामध्ये ते मानवी मृतदेहाचे विच्छेदन करतात. हा त्यांचा पहिला रुग्ण असतो. कदाचित हा त्यांनी कधीही पाहिलेला किंवा स्पर्श केलेला पहिला मृतदेह असू शकतो.

जेव्हा ते ग्रॉस एनाटॉमी खोलीत प्रवेश करतात, तेव्हा त्यांना वेगवेगळे मृतदेह दिसतात.ज्यापैकी प्रत्येक मानवी आकार चकित करणाऱ्या विविधतेचे उदाहरण असते. वैद्यकीय विद्यार्थी आणि त्यांचा पहिला मृतदेह यांच्यातील संबंध विशेष असतो. मृतदेह विद्यार्थ्याला अन्यथा मिळू न शकणारे ज्ञान प्रदान करतो; विद्यार्थी या देणगीबद्दल आश्चर्यचकित आणि कृतज्ञ असतो. असे डॉक्टर्स मानतात.शरीर भविष्यातील डॉक्टरांना स्पाइनल टॅप घालण्यासाठी किंवा अपेंडिसाइटिस वगळण्यासाठी आवश्यक शारीरिक चिन्हे शिकवू शकते. एका शल्यचिकित्सकाला माझ्या हातातील नाजूक नसा विच्छेदन करायला शिकता येईल. किंवा, कदाचित, एका पॅथॉलॉजिस्टला मृत्यूपूर्वीची आणि मृत्यूनंतरची रक्त गुठळी यातील फरक जाणवू शकेल.रिल्स आणि सोशल मीडियाच्या या युगात, क्षणिक प्रसिद्धीसाठी नैतिकतेचा बळी देण्याची मानसिकता वाढीस लागली आहे. डॉ. आशा कदम यांची ही भीती खरी आहे की, रिलच्या नादात आपली पुढची पिढी काही चुकीचं-बेजबाबदार तर बोलत नाही ना, पाहत नाही ना, किंवा फॉलो तर करत नाही ना, हे पाहण्याची जबाबदारी आपलीच आहे. या पार्श्वभूमीवर, शरीरदानाचा संकल्प करणे म्हणजे केवळ एका व्यक्तीचा निर्णय नसून, तो एक सामाजिक विधान आहे की आपण ज्ञानाला, सेवेला आणि मानवतेला सर्वोच्च स्थान देतो.

मरावे परी कीर्ती रूपे उरावे या उक्तीला खऱ्या अर्थाने सार्थ करणारी ही चळवळ आहे. मृत्यू हा जीवनाचा शेवट नसून, शरीरदानाद्वारे तो एका नव्या, अखंड सेवेचा आणि ज्ञानप्रवाहाचा आरंभबिंदू ठरतो. लोक त्यांच्या मृत्यूने जिवंतांना मदत करू शकतात. अनास्था, आळस, अज्ञान आणि अंधश्रद्धा यांची मानसिक होळी करून, आपण सर्वांनी या ज्ञानदानाच्या पवित्र वाटेवर पाऊल ठेवायला हवे. कारण, आपले शरीर हे मातीत मिसळून जाण्यापेक्षा किंवा राख होण्यापेक्षा, कोणाच्या तरी ज्ञानाचा प्रकाश बनले, तर त्यापेक्षा श्रेष्ठ कार्य दुसरे ते कोणतेच असू शकत नाही.

***समाप्त***

# नवीन कायद्यात ऐतिहासिक,धार्मीक, सामाजिक व लोकशाही मूल्यांचा विचार होणे आवश्यक

महाराष्ट्र शासनाने सचखंड गुरुद्वारा बोर्ड अधिनियम १९५६ मध्ये व्यापक बदल करण्याचा निर्णय घेतल्याची चर्चा सुरू आहे. या पार्श्वभूमीवर नवीन कायदा तयार करताना काही ऐतिहासिक, धार्मिक, सामाजिक व लोकशाही मूल्यांचा सखोल विचार होणे अत्यंत आवश्यक आहे.सचखंड श्री हजूर साहिब गुरुद्वारा हे केवळ महाराष्ट्राचेच नव्हे तर संपूर्ण जगातील सिक्ख समाजाचे सर्वोच्च श्रद्धास्थान आहे. जगभरातील लाखो भाविकांच्या श्रद्धा, आस्था आणि भावनिक नाते या पवित्र स्थानाशी जोडलेले आहे. त्यामुळे या गुरुद्वाऱ्याची ऐतिहासिक परंपरा, मर्यादा, पाठपूजा आणि धार्मिक वैशिष्ट्ये अबाधित राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे.



विशेष म्हणजे, सचखंड गुरुद्वाऱ्याच्या साडेतीनशे वर्षांहून अधिक काळ चालत आलेल्या परंपरा आणि मर्यादा जतन करण्यात मराठवाड्यातील, विशेषतः नांदेडच्या स्थानिक शीख समाजाचे मोठे योगदान राहिले आहे. अनेक संकटे, आर्थिक अडचणी आणि प्रतिकूल परिस्थिती असतानाही स्थानिक समाजाने आपल्या श्रद्धा, त्याग आणि सेवाभावाच्या बळावर या पवित्र स्थानाची सेवा, देखभाल आणि परंपरा अखंडपणे जिवंत ठेवली आहे. हा इतिहास विसरून चालणार नाही.इतकेच नव्हे तर मराठवाड्यातील शीख समाज हा तीन ते साडेतीनशे वर्षांपासून या भूमीचा अविभाज्य घटक राहिला आहे. येथील शीख समाजाने महाराष्ट्राच्या भाषा, संस्कृती, परंपरा आणि सामाजिक जीवनाशी पूर्णपणे एकरूप होत आपली स्वतंत्र धार्मिक ओळख जपत महाराष्ट्राच्या विकासातही मोलाचे योगदान दिले आहे. त्यामुळे मराठवाड्यातील शीख समाज हा केवळ धार्मिक समुदाय नसून महाराष्ट्राच्या सामाजिक-सांस्कृतिक वारशाचा एक महत्त्वाचा भाग आहे.याउलट महाराष्ट्रातील इतर अनेक भागांमध्ये वास्तव्यास असलेल्या बहुसंख्य शीख बांधवांचे पूर्वज विविध काळात इतर राज्यांतून स्थलांतरित होऊन किंवा भारताच्या फाळणीनंतर विस्थापित अवस्थेत महाराष्ट्रात स्थायिक झालेले आहेत. त्यांचा आदर राखत असे म्हणावे लागेल की, सचखंड गुरुद्वाऱ्याच्या ऐतिहासिक मर्यादा, परंपरा, स्थानिक धार्मिक रीतिरिवाज आणि नांदेडशी असलेले भावनिक नाते यांचा अनुभव आणि जिव्हाळा मराठवाड्यातील स्थानिक शीख समाजाला ज्या प्रमाणात आहे, त्याच प्रमाणात तो इतरांना असणे स्वाभाविकपणे अपेक्षित धरता येणार नाही. कारण ही भावना अनेक पिढ्यांच्या सेवेतून, त्यागातून आणि स्थानिक इतिहासाशी असलेल्या जिवंत नात्यातून निर्माण झालेली आहे.म्हणूनच नवीन कायदा तयार करताना स्थानिक शीख समाजाच्या भावना, अनुभव आणि ऐतिहासिक योगदान यांना योग्य स्थान मिळणे आवश्यक आहे. कारण या गुरुद्वाऱ्याविषयीची आत्मीयता, जिव्हाळा आणि भावनिक नाते स्थानिक समाजाच्या जीवनाशी घट्ट जोडलेले आहे.त्यांच्या रोमरोमात सचखंड गुरुद्वाऱ्याविषयीची सेवा आणि समर्पणाची भावना रुजलेली आहे.

राजेंद्रसिंघ शाहू
नांदेड

गेल्या अनेक वर्षांपासून गुरुद्वारा बोर्डाचा कारभार प्रशासकांमार्फत चालविण्यात आला. परंतु बाहेरून नियुक्त केलेल्या प्रशासकांना स्थानिक परिस्थिती, धार्मिक परंपरा आणि दैनंदिन व्यवस्थापनासाठी आवश्यक असलेली सततची उपस्थिती राखणे अनेकदा कठीण गेले. प्रवास, निवास आणि प्रशासकीय खर्चामुळे बोर्डावर अतिरिक्त आर्थिक भार पडल्याच्याही चर्चा वेळोवेळी झाल्या आहेत. त्यामुळे स्थानिक प्रतिनिधित्व असलेली, जबाबदार आणि लोकशाही तत्त्वांवर आधारित व्यवस्थापन प्रणाली अधिक परिणामकारक ठरू शकते.लोकशाही व्यवस्थेचा मूलभूत गाभा म्हणजे स्थानिक लोकांचा सहभाग. त्यामुळे नवीन कायद्यात स्थानिक शीख समाजाला विश्वासात घेऊन, पारदर्शक आणि लोकशाही पद्धतीने व्यवस्थापनाची रचना करण्याचा विचार होणे आवश्यक आहे. स्थानिक प्रतिनिधी २४ तास उपलब्ध राहून सेवा, व्यवस्थापन, भाविकांच्या अडचणी आणि धार्मिक कार्यक्रमांचे प्रभावी नियोजन करू शकतात.

विशेषतः शासनाने हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, सचखंड गुरुद्वाऱ्याच्या मर्यादा, परंपरा आणि व्यवस्थापनाबाबत निर्णय घेताना त्या परंपरा अनेक पिढ्यांपासून जपणाऱ्या स्थानिक समाजाच्या मताला प्राधान्य देणे हे लोकशाही आणि नैसर्गिक न्यायाच्या तत्त्वांनुसार अधिक योग्य ठरेल. कोणतीही नवीन रचना स्थानिक समाजाच्या सहभागाशिवाय किंवा त्यांच्या विश्वासाशिवाय निर्माण झाल्यास भविष्यात अनावश्यक मतभेद आणि असंतोष निर्माण होण्याची शक्यता नाकारता येणार नाही.यासोबतच नांदेड हे विविध धर्म, पंथ आणि संस्कृतींचे शांततापूर्ण सहअस्तित्व जपणारे शहर आहे. गुरुद्वारा व्यवस्थापनात स्थानिक सहभाग वाढल्यास सामाजिक सलोखा, परस्पर विश्वास आणि शहराच्या विकासालाही सकारात्मक दिशा मिळू शकते.जर शासनाने विकेंद्रीकरणाच्या माध्यमातून नवीन कायदा तयार करण्याचा निर्णय घेतलाच, तर तो स्थानिक शीख समाज, सामाजिक कार्यकर्ते, धार्मिक संस्था, तज्ज्ञ व्यक्ती तसेच नांदेडमधील सर्वपक्षीय लोकप्रतिनिधी यांना विश्वासात घेऊनच तयार करावा. अशा व्यापक चर्चेनंतर तयार होणारा कायदा अधिक न्याय्य, स्वीकारार्ह आणि दीर्घकालीन ठरेल. या संपूर्ण प्रक्रियेत नांदेडचे आमदार, खासदार, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि सर्व राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची राहणार आहे. त्यांनी पक्षीय राजकारणापलीकडे जाऊन स्थानिक जनभावना, लोकशाही मूल्ये आणि सचखंड गुरुद्वाऱ्याचे ऐतिहासिक महत्त्व यांचा सन्मान राखत योग्य न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे अपेक्षित आहे.आज आवश्यकता आहे ती कोणत्याही एका गटाचा विजय किंवा पराभव ठरविण्याची नाही, तर सचखंड गुरुद्वाऱ्याची गौरवशाली परंपरा, धार्मिक मर्यादा, स्थानिक भावविश्व आणि लोकशाही मूल्ये यांचे संरक्षण करणारा संतुलित व दूरदृष्टीचा कायदा निर्माण करण्याची आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाने नवीन कायदा तयार करण्यापूर्वी नांदेड व मराठवाड्यातील स्थानिक शीख समाजाच्या ऐतिहासिक भूमिकेचा, त्यागाचा, भावनिक नात्याचा आणि दीर्घकालीन योगदानाचा गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. सचखंड गुरुद्वारा हा केवळ एका समाजाचा विषय नाही, तर तो नांदेडच्या ओळखीचा, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा आणि जगभरातील शीख श्रद्धेचा अविभाज्य भाग आहे. त्यामुळे कोणताही नवीन कायदा करताना धार्मिक परंपरा, स्थानिक भावना, ऐतिहासिक योगदान आणि लोकशाही सहभाग यांचा समतोल साधणे हेच शासनासमोरील सर्वात मोठे कर्तव्य ठरणार आहे.

सायं दैनिक नांदेड वार्ता
* संपर्क कार्यालय *
व्ही.डी.देशपांडे भवन, सोमेश कम्पाऊंड, मिलगेट जवळ, नांदेड-१
**मुख्यसंपादक**-प्रदीप नागापूरकर,भ्रमणध्वनी ९४२२१७४७७४,
**सहसंपादक**-अविनाश पाटील, भ्रमणध्वनी ९४२१९९०८८८
E-mail: nandedwarta@mail.com

# नायब मुतवली खून प्रकरणातील आरोपींना पोलीस कोठडी

नांदेड/प्रतिनिधी-खडकपुरा भागातील दोन धार्मिक स्थळांची देखरेख करण्याची जबाबदारी असलेल्या नायब मुतवली शेख शमीम याच्या हत्ये प्रकरणी अटक करण्यात आलेल्या पाच आरोपींना सोमवारी न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने आरोपींची चार दिवसाची पोलीस कोठडी सुनावली.

२१ जून रोजी रविवारी पहाटे वाघी रोडवरील बरकतपुरा भागात गोळीबार आणि तलवारबाजीचा थरार घडला होता. दुचाकीवरुन आलेल्या हल्लेखोरांनी नायब मुतवली शेख शमिम यांच्यावर गोळीबार आणि शस्त्राचे घाव घालून हत्या केल्यानंतर मारेकरी पसार झाले होते. तर दुसरीकडे खडकपुरा भागात तणावसदृष्य परिस्थीती निर्माण झाली होती. हल्लेखोरांना पकडण्यासाठी पोलिसांचे १४ पथक तयार करण्यात आले होते. अखेर मिर्झा शब्बीर बेग गफार बेग, ऋषिकेश अनिल घुगे, स. सुफीयान स.जमीर, माधव भगवान कांबळे, मुस्ताक अहेमद इसाक अहेमद या आरोपींना पकडण्यात पोलिसांना यश आले. या सर्व आरोपींना २६ जून पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आल्याने बरेच काही समोर येण्याची शक्यता आहे. नायब मुतवली मयत शेख शमीम यांच्यावर सन २०१२ पासून धार्मिक स्थळाचे देखरेख करण्याची जबाबदारी होती. दरम्यान यातील फरार आरोपी शब्बीर आणि मयत शेख शमीम यांच्यात सन २०२३ पासून वाद सुरु होता. त्या काळात शब्बीर याच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर ती केस मागे घे म्हणून धमक्या देत होता.

# जनावरे चोरी करणाऱ्या टोळीतील दोन जणांना अटक;१४ गुन्हे उघडकीस

नांदेड/प्रतिनिधी-जनावरांची चोरी करुन विक्री करणाऱ्या टोळीतील दोन जणांना स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी अटक केली आहे. आरोपींनी नांदेड जिल्ह्यात १४ गुन्हे केल्याची कबुली दिली असून त्यांच्या जवळून एका इनोव्हा कारसह १५ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे.

पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार, अतिरिक्त पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे फौजदार महेश कोरे व पोलीस कर्मचारी हे सोमवार दि.२२ जून रोजी नांदेड शहरात गस्त घालीत असतांना त्यांना खबऱ्याकडून माहिती मिळाली की, जनावरे चोरी करणाऱ्या टोळीतील काही जण बोंढार बायपास रोडवरील नदीच्या काठावर असलेल्या वाहेद कॉलनी भागात भाड्याने राहत आहेत. स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाचे पोलीस निरिक्षक अतुल भोसले, फौजदार महेश कोरे, फौजदार इरफान सय्यद, फौजदार बळीराम दासरे, फौजदार माधव केंद्रे व पोलीस कर्मचाऱ्यांनी सोमवारी सायंकाळी वाहेद कॉलनी येथील शेख सलीम यांच्या घरावर छापा टाकला. तेथुन पोलीसांनी आजीम रौफ गाजी (वय ३१) रा.बैल बाजार, आंबेडकर रोड कल्याण, जि.ठाणे, सय्यद सलीम उर्फ बाबू सय्यद समी अहेमद (वय २३) रा.लेबर कॉलणी,नांदेड यांना अटक केली. पोलीसांनी त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी आपले साथीदार सय्यद सोहेल सय्यद फारुख उर्फ पटेल रा.लेबर कॉलणी,नांदेड, अबुसांड उर्फ अबु पटेल रा.लेबर कॉलणी,नांदेड, अल्ताफ अन्सारी रा.भिंवडी, अज्जु अन्सारी रा.कल्याण, पप्पु तुंडा रा.भिवंडी, बाबुजी रा.भिंवडी, रहिम कुरेशी रा.कल्याण, शाहरुख रा.कल्याण, तौकीर रा.कल्याण, फहीम रा.कल्याण, आलम अनिस शेख रा.अन्सार कॉलणी,कल्याण, तब्बस शकील शेख रा.कानेगाव, कल्याण, फरमान साबिर शेख रा.नेहरुनगर,मुंबई, साहिब कादरी रा.नायगाव, भिवंडी, वसीम जमील शेख रा.कानेगाव,कल्याण यांच्यासोबत नांदेड जिल्ह्यात १४ ठिकाणी जनावरांची चोरी केली आहे. गोवंशीय जनावरांना गुंगीचे इजेक्शन देवून नंतर त्यांना इनोव्हा गाडीत टाकून विक्री केल्याची कबुली दिली. पोलीसांनी दोन आरोपीकडून एक इनोव्हा कार, रोख २ लाख ६२ हजार रुपये, सिरीन इजेक्शन व इतर साहित्य असा १५ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला आहे. या टोळीतील १७ पैकी पाच आरोपींना तेलंगणातील आदिलाबाद पोलीसांनी यापूर्वीच अटक केली असून सध्या ते तुरुंगात आहेत. इतर आरोपी फरार असून पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.



# डॉ.श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या बलिदान दिनानिमित्त अभिवादन



मांडवी/प्रतिनिधी-भारतीय जनसंघाचे संस्थापक तथा भारतीय जनता पक्षाच्या वैचारिक पायाभरणीत महत्त्वाची भूमिका बजावणारे प्रखर राष्ट्रभक्त डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या बलिदान दिनानिमित्त मंगळवार (दि.२३) रोजी मांडवी येथील भाजपा कार्यालयात त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी डॉ. मुखर्जी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून आदरांजली वाहिली. देशाच्या राष्ट्रीय एकता आणि अखंडतेसाठी त्यांनी दिलेले सर्वोच्च बलिदान देशवासीय कधीही विसरणार नाही, अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या. कार्यक्रमात डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांच्या राष्ट्रसेवेचा आणि देशहितासाठीच्या योगदानाचा गौरव करण्यात आला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्पही यावेळी व्यक्त करण्यात आला.या अभिवादन कार्यक्रमास अविनाश राठोड, दिनेश रूनवाल, अमोल राठोड, पल्लू नाईक, युवराज आडे, शाकित पठाण, गजानन जाधव यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नायगाव तालुक्यात भेसळयुक्त लोणी विक्रीचा संशय

नायगाव/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यात भेसळयुक्त खाद्यपदार्थांच्या विक्रीत पुन्हा वाढ झाल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत असून, विशेषतः कमी दरात विकल्या जाणाऱ्या लोण्याबाबत गंभीर शंका उपस्थित करण्यात येत आहे. अन्न व औषध प्रशासनाच्या कथित दुर्लक्षामुळे भेसळयुक्त अन्नपदार्थांची खुलेआम विक्री होत आहे.

नायगाव तालुक्यात खाद्यतेल, तेलापासून बनविलेले विविध पदार्थ, कृत्रिम दुग्धजन्य पदार्थ तसेच काही बेकरी दुकानांमध्ये बनावट लेबल असलेल्या खाद्यपदार्थांची विक्री सुरू असल्याचा आरोप आहे. काही दिवसांपूर्वी भेसळीविरोधात आवाज उठल्यानंतर या प्रकारांना काही प्रमाणात आळा बसला होता. मात्र, पुन्हा एकदा अशा पदार्थांची विक्री वाढल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. सध्या बाजारात लोणी प्रति किलो ३५० ते ४०० रुपये दराने विकले जात असून, त्यापासून सुमारे ६५० ग्रॅम तूप तयार होत असल्याचे सांगितले जाते. दुसरीकडे तुपाचा बाजारभाव प्रति किलो सुमारे १,००० रुपये असल्याने इतक्या कमी किमतीच्या लोण्यापासून इतक्या प्रमाणात तूप कसे तयार होते, याबाबत नागरिकांनी संशय व्यक्त केला आहे. संबंधित लोण्याचे नमुने घेऊन प्रयोगशाळेत तपासणी करण्यात यावी आणि वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी होत आहे. याचबरोबर, नायगाव तालुक्यात गुटखा विक्रीवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. राज्यातील अनेक भागांत गुटखा विक्रेत्यांवर कारवाई होत असताना, नायगाव तालुक्यात मात्र गुटखा सहज उपलब्ध होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. गुटखा विक्रीचे मोठे सिंडिकेट कार्यरत असल्याची चर्चा असून, संबंधित यंत्रणांनी तातडीने तपास करून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.नायगाव तालुक्यातील भेसळयुक्त अन्नपदार्थ व गुटखा विक्रीच्या तक्रारींची दखल घेऊन अन्न व औषध प्रशासनाने विशेष तपास मोहीम राबवावी, संशयित ठिकाणांवर छापे टाकून नमुने तपासणीसाठी पाठवावेत आणि दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे.

# माळेगाव मक्ता येथे वादळी पावसाचा तडाखा;घरांची पडझड

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील माळेगाव मक्ता येथे रविवार (दि.२१ जून) रात्री सुमारे नऊच्या सुमारास झालेल्या जोरदार वादळी पावसाने मोठे नुकसान झाले. अवघ्या दहा ते पंधरा मिनिटे सुरू असलेल्या पावसासह आलेल्या तीव्र वादळामुळे गावातील सात ते आठ कुटुंबांना मोठा फटका बसला असून अनेक घरांवरील पत्रे उडून गेली, तर अन्नधान्य व घरगुती साहित्याचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या नैसर्गिक आपत्तीत प्राथमिक अंदाजानुसार १५ ते २० लाख रुपयांचे नुकसान झाल्याची माहिती समोर आली आहे.

अचानक आलेल्या वादळामुळे काही घरांची मोठ्या प्रमाणात पडझड झाली. परिस्थिती गंभीर झाल्याने दोन बाधित कुटुंबांतील सदस्यांना सुरक्षित स्थळी हलविण्यात आले. मुख्य रस्त्यावरील अनेक मोठी झाडे उन्मळून पडल्याने वाहतूक काही काळ विस्कळीत झाली. त्यामुळे देगलूर आगाराची एसटी बस तसेच तेलंगणा राज्य परिवहन मंडळाची बस काही तास रस्त्यावरच अडकून पडली. दळणवळण व्यवस्था ठप्प झाल्याने नागरिकांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागला. घटनेनंतर ग्रामस्थांनी आणि प्रशासनाने तातडीने मदतकार्य हाती घेतले. पोकलेन मशीनच्या साहाय्याने रस्त्यावर पडलेली झाडे हटवून मुख्य मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्यात आला. त्यामुळे वाहतूक पूर्ववत होण्यास मदत झाली. वादळामुळे गावातील वीजपुरवठाही खंडित झाला होता. वीज वितरण विभागाच्या कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर प्रयत्न करून काही तासांत बहुतांश भागातील वीजपुरवठा सुरळीत केला. या घटनेची माहिती वरिष्ठ प्रशासनिक अधिकाऱ्यांना देण्यात आली असून नुकसानग्रस्तांच्या पंचनाम्याची प्रक्रिया तातडीने पूर्ण करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. माळेगाव मक्ता येथील प्रभारी सरपंच शिवराज पाटील माळेगावकर यांनी शासन आणि प्रशासनाकडे नुकसानग्रस्त कुटुंबांना तातडीची आर्थिक मदत, नुकसानभरपाई तसेच पुनर्वसनासाठी विशेष सहाय्य देण्याची मागणी केली आहे.

# पीएम सूर्यघर मुक्त बिजली योजनेत बारड गावाला १ कोटींचे बक्षीस जाहीर

मुदखेड/प्रतिनिधी-केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी 'पीएम सूर्यघर मुक्त बिजली योजना' अंतर्गत 'मॉडेल सोलर व्हिलेज' स्पर्धेत मुदखेड तालुक्यातील बारड गावाने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या घवघवीत यशामुळे बारड गावाला शासनाकडून १ कोटी रुपयांचे भव्य बक्षीस मिळणार आहे. महावितरणचे नांदेड परिमंडळाचे अधीक्षक अभियंता संजय कंधारे यांच्या हस्ते बारड गावच्या निवडीचे अधिकृत पत्र नुकतेच प्रदान करण्यात आले.

शासनामार्फत दि.१४ नोव्हेंबर २०२५ ते १४ मे २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीत ही स्पर्धा राबविण्यात आली होती. यामध्ये नांदेड जिल्ह्यातील ५ हजारा पेक्षा जास्त लोकसंख्या असलेली ३१ गावे निवडली गेली होती. या सर्व गावांना मागे टाकत बारड गावाने सौर ऊर्जेच्या निर्मितीत अव्वल स्थान गाठले. बारड गावचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब देशमुख बारडकर यांच्या दूरदृष्टीमुळे आणि मार्गदर्शनामुळे हे यश शक्य झाले. त्यांनी गावातील मालमत्ताधारक, व्यापारी आणि शेतकऱ्यांची बैठक घेऊन भविष्यातील विजेचे महत्त्व आणि अडचणी समजावून सांगितल्या. बँक कर्जाच्या माध्यमातून आणि तांत्रिक व कागदपत्रांच्या अडचणी दूर करून गावातील जास्तीत जास्त घरांवर सौर पॅनेल बसवण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केले. ३५ एकरांवर सौर प्रकल्पः बारड ग्रामपंचायतीने स्वतःच्या मालकीच्या ३५ एकर गायरान जमिनीवर सौर प्रकल्प उभारला आहे, ज्याच्या माध्यमातून परिसरातील शेतकऱ्यांना दिवसा हक्काची वीज मिळत आहे. अभियान काळात गावातील नागरिक, व्यापारी आणि शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात सोलर यंत्रणा बसवली. यामुळे बारड गावची एकूण सौर ऊर्जा निर्मिती क्षमता तब्बल ९२८ (किलोवॅट) झाली आहे. जिल्ह्यातील सहभागी गावांमध्ये ही क्षमता सर्वाधिक असल्याने बारड गावाची १ कोटी रुपयांच्या बक्षिसासाठी निवड झाली. महावितरणचे अधीक्षक अभियंता संजय कंधारे यांच्या हस्ते निवडीचे पत्र देताना ज्येष्ठ नेते बाळासाहेब देशमुख बारडकर, उपसरपंच प्रदीप देशमुख, भाजप जिल्हा कोषाध्यक्ष दिगंबराव टिपरसे, भाजप तालुका सरचिटणीस सचिन पाटील मगरे, येळेगावचे युवा कार्यकर्ते नवनाथ कपाटे आणि जी. एस. सय्यद आदी मान्यवर उपस्थित होते.



## रेती वाहतूक करणारा हायवा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-भोकर शहरातील उमरी रोडवर रविवारी रात्री पोलीसांनी अवैधरित्या रेती वाहतूक करणारा हायवा पकडला आहे. याप्रकरणी दोन जणांना अटक करण्यात आली असून त्यांच्या विरुध्द भोकर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.


जा.क्र.नांवाशमनपा/क्षेका.क्र.६/नांपवि/६३३/२०२६
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड.
दिनांक : ८/०६/२०२६

## जाहीर प्रगटन

**संचिका क्रं.६८/४०/क्षे.का.क्र.६(सिडको)/२०२६-२७**
**प्रकरण : नांव परिवर्तन करणे बाबत.**

या जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, **लक्ष्मी बालाजी कोष्टी मौजे वसरणी** रा.**वसरणी,**नांदेड यांचा अर्ज दि.**२३/०३/२०२६** यांनी अर्ज सादर केला आहे की मनपा/सिडको घर क्रं.**-- टाईप -- सेक्टर -- शेत सर्वे नं.१८ गट नं.--** प्लॉट/प्लॅट (सदनिका) क्र.**१७** एकूण क्षेत्रफळ **५५.७६** चौ./मी. चौ.फूट आहे.

ज्याचा महानगरपालिका मालमत्ता क्रं.११-**१-७२१/१७ B** पिन क्रं.**४०४११०१०१००** मौजे वसरणी **श्री.सोपान पि.मारोती आंचेवार व इतर** यांचे नांवे नोंद असलेली मालमत्ता अर्जदाराने खरेदीखत/विक्रीखत/सोसायटी कन्हेन्सडीड/ओनरशिप पध्दतीने विक्रीखत/हडको दस्त क्रं.**२०६३/२०२६ दि.२०/०२/२०२६ व** सिडको प्रशासन भाडे पट्टा हस्तांतरण आदेश **(T.T.O.)** क्रं.सिडको ट्रान्सफर ऑर्डर दस्त क्र. **CIDCO/ADM/NND/** / दि. / / सातबारा पत्रक दि.---- व लिंक दस्त क्र.---- दि.---- आधारे ---- प्राप्त झालेली आहे. त्यांचे नावाचे नोंद नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर आकारणी नोंद घेण्यात येत आहे.

तरी या संबंधात कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसाचे आत या कार्यालयात आपला लेखी आक्षेप पुराव्यासह दाखल करावा. अन्यथा वरील आवधी संपल्यानंतर सदरील मालमत्तेवर अर्जदाराचे नावाने मालमत्ता कर आकारणी नोंदवहीत सदरील नावाची नोंद घेण्यात येईल.

**चर्तुःसिमाः- पुर्व**- प्लॉट नं.०७ आहे, **पश्चिमेस**-१५ फूट रुंद रोड आहे, **दक्षिणेस**-प्लॉट नं.१८ आहे, **उत्तरेस**-प्लॉट नं.१६ प्रमाणे.

स्वाक्षरित/-
**क्षेत्रीय अधिकारी,**
क्षेत्रिय कार्यालय क्रं.६ (सिडको),
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका,नांदेड



## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ६ वे सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड यांच्या न्यायालयात
समक्ष एम.आर.कायस्थ सह दि.न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.८३४/२०२६

१. पार्वतीबाई मारोतीराव सरपाते वय ८० वर्ष धंदा निल, २. गौतम पि.मारोतराव सरपाते वय ६० वर्ष धंदा लेबर दोघे रा.प्रभातनगर ता.जि.नांदेड

विरुद्ध
निल

दावा : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम २ व ३ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे ज्याअर्थी अर्जदार मयत मारोतराव विठलराव सरपाते यांचे वारस आहेत मयत मारोतराव विठलराव सरपाते यांचा मृत्यू दिनांक १६/०३/२०२६ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात दिनांक ०६/०८/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २२/०६/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**क.लिपीक**
६ वे सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**स.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड



## जाहीर प्रगटन

नांदेड येथील ७ वे सह दिवाणी न्यायाधिश क.स्तर, नांदेड
यांच्या न्यायालयात
(समक्ष श्री.ए.जी.चव्हाण)
किरकोळ दिवाणी अर्ज क्र.७१२/२०२६
सुर्यकांत व इतर वि.निल

अर्जदार : १) सुर्यकांत पि.सखाराम सोनटक्के वय ५१ वर्ष धंदा मजुरी, २) मनोहर पि.सखाराम सोनटक्के वय ४७ वर्ष धंदा मजुरी, ३) सुनिता भ्र.सुरेश ठाकूर वय ४५ वर्ष धंदा-घरकाम सर्व रा.वाहेगाव ता.जि.नांदेड

विरुद्ध
निरंक

प्रकरण : वारसा प्रमाणपत्र मिळण्याचा अर्ज

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. वरील अर्जदार मयत ललीताबाई भ्र. सखाराम सोनटक्के यांचे वारस आहेत. मयत यांचा दिनांक १३/११/२०२५ रोजी मृत्यु झाला. अर्जदारांनी अर्जात नमुद केले आहे की, अर्जदार क्र.१ व २ ही मुले असून अर्जदार क्र.३ ही मयताची विवाहीत मुलगी आहे.

वर नमुद अर्जदाराशिवाय ईतर कोणीही मयताचे कायदेशिर वारसदार नसल्याचे अर्जदाराने अर्जात कथन केले आहेत.

तरी,प्रस्तुत प्रकरणी अर्जदाराच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः हजर राहून या न्यायालयात दिनांक ०१/०७/२०२६ रोजी किंवा एक महिन्याच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २३.०६.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिला.

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
७ वे सह दिवाणी न्यायालय
क.स्तर,नांदेड

''आदेशावरुन''
स्वाक्षरित/-
**सहा.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड



## CHANGE IN NAME

My (old name) is **ASIA TAFHEEM** which now I am, changing as (new name) **ASIA TAFHEEM MOHAMMED WAHEEDUDDIN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**ASIA TAFHEEM MOHAMMED WAHEEDUDDIN**
H.no.699, B AND C Colony near
Masjid-e-sumayya Chaitanya nagar
Nanded-431605
M.No.-9890915861



## CHANGE IN NAME

My (old name) is **MOHAMAD SABER** which now I am, changing as (new name) **MOHAMAD SABERODDIN AJIMODDIN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**MOHAMAD SABERODDIN AJIMODDIN**
H.no.699, B AND C Colony near
Masjid-e-sumayya Chaitanya nagar
Nanded-431605
M.No.-9890915861



## CHANGE IN NAME

My (old name) is **MOHAMAD SABERODDIN** which now I am, changing as (new name) **MOHAMAD SABERODDIN AJIMODDIN**

Hence, forth my all correspondance will be done as per my new name. please consider the same.

Sign by
**MOHAMAD SABERODDIN AJIMODDIN**
H.no.699, B AND C Colony near
Water tank Taroda BK Nanded-431605
M.No.-9890915861

# दुष्काळी परिस्थितीत चारा उत्पादनास चालना

## पशुपालकांना वैरण बियाण्यांचे वाटप

नांदेड/प्रतिनिधी-जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) २०२६२०२७ अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या चारा उत्पादन योजनेच्या माध्यमातून पशुपालकांना प्रातिनिधिक स्वरूपात वैरण बियाण्यांचे वाटप करण्यात आले. हा कार्यक्रम जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या कार्यक्रमास जिल्हा नियोजन अधिकारी, नांदेड, जिल्हा उपआयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय, सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय तसेच पशुधन विकास अधिकारी उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी राहूल कर्डीले यांनी दुष्काळी परिस्थितीत पशुधनासाठी पुरेशा चाऱ्याची उपलब्धता सुनिश्चित करण्यासाठी चारा उत्पादनाचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच पशुपालकांनी मुरघास (सायलेज) निर्मिती व वापराला प्राधान्य द्यावे, असे आवाहन केले.याशिवाय मुख्यमंत्री ग्रामीण पशुधन उद्योजकता योजना अंतर्गत उपलब्ध सुविधांचा लाभ घेऊन जास्तीत जास्त पशुपालक शेतकऱ्यांनी पशुपालन व्यवसाय अधिक सक्षम व आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असेही त्यांनी सांगितले.कार्यक्रमात उपस्थित पशुपालकांना चारा उत्पादन व पशुधन व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

# खा.आष्टीकर यांनी खासदारकीचा राजीनामा देवून नवा राजकीय संसार थाटावा

## उमरखेड-महागाव मतदारसंघातील नागरिकांच्या प्रतिक्रिया

उमरखेड/प्रतिनिधी-शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी हिंगोली लोकसभा मतदारसंघातून नागेश पाटील आष्टीकर यांना उमेदवारी दिली होती. महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी अहोरात्र परिश्रम घेवून आष्टीकर यांना मताधिक्यांनी विजयी केले. खा.आष्टीकर यांनी कोलांटउडी मारुन शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. खासदारकीचा राजीनामा देवून आष्टीकरांनी नवीन संसार थाटावा अशा प्रतिक्रिया उमरखेड-महागाव मतदारसंघातील सर्वसामान्य जनतेतून व्यक्त होत आहे.

एकनाथ शिंदेच्या बंडानंतर उद्धव ठाकरे यांची शिवसेना पुर्ववत होण्याच्या मार्गावर असतांना आणखी मोठा धक्का देत एकनाथ शिंदे यांनी महाशक्तीच्या बळावर नुकतेच ६ खासदार फोडले हे मात्र जनसामान्यांना भावले नाही. आधीच्या पेक्षा यावेळी मात्र सर्वसामान्य मतदारांमध्ये या राजकिय तमाशाबद्दल जागोजागी तसेच सोशल मिडियावर लोकांच्या मनातील तिव्र संताप व्यक्त होतांना दिसत आहे. फुटलेल्या या ६ पैकी यवतमाळ वाशीमचे खा.संजय



देशमुख व यवतमाळ जिल्ह्याच्या उमरखेड महागाव विधानसभा मतदार संघाचा समावेश असलेल्या हिंगोली लोकसभा मतदार संघाचे खा.नागेश पाटील आष्टीकर या दोघांनी उद्धव सेनेला जयमहाराष्ट्र ठोकून शिंदे सेनेची कास धरली. हिंगोली लोकसभा मतदार संघातील मतदारांनी भाजपा सह एकनाथ शिंदेच्या सेनेबद्दल रोष व्यक्त करीत त्यांना नाकारून उध्दव ठाकरे यांच्या पक्षावर विश्वास व्यक्त करीत महाविकास आघाडीच्या नागेश पाटील आष्टीकरांना भरभरून मतदान करून निवडून आणले त्यांनीही पुन्हा गद्दारीचा कित्ता गिरवावा ही मतदारांची मुळीच इच्छा नसतांना मतदारांचा विश्वासघात करून नागेश पाटील आष्टीकरांनी शिंदेसेनेत प्रवेश केल्याने सर्वसामान्य मतदारांच्या भावना भडकल्या आहेत. त्यांची

> शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी जाहीर केलेल्या उमेदवाराला निवडून आणण्यासाठी निष्ठावान शिवसैनिक व महाविकास आघाडीच्या काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार या घटक पक्षातील कार्यकर्त्यांनी जिवाचे रान करून भाजपा महाशक्तीच्या विरोधात नागेश पाटील आष्टीकरांना निवडून आणले ते भाजपाचा व शिंदेसेनेचा विरोध म्हणूनच याची जाणिव असतांनाही लोभापायी पक्षाशी व मतदारांशी विश्वासघात करून शिंदे सेनेत प्रवेश करणाऱ्या आष्टीकरांनी खासदारकीचा राजीनामा देऊनच पुन्हा निवडणूक लढवून खासदार व्हावे व आपली कथीत निष्ठा शिंदे सेनेच्या चरणी अर्पण करावी.
>
> **- संजय पळसकर**
>
> जिल्हा समन्वयक शिवसेना उबाठा पक्ष, उमरखेड

ही विचित्र कृती पक्षापेक्षा आता मतदारांच्याच जिव्हारी लागल्याचे सोशल मिडीयावरील तिखट प्रतिक्रियांवरून दिसून येत आहे. खा.नागेश पाटील आष्टीकर यांनी आयत्या खासदारकीचा राजीनामा देऊन पुन्हा लोकसभेला निवडून यावे व खासदारकी मिळवावी, व मतदारांच्या विश्वासघाताचा कलंक पुसून काढावा, अशा प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

# मतदानपत्रिकेने घेतली परीक्षा;२३ लोकप्रतिनिधी ठरले अनुत्तीर्ण

## बाद मतदारांवरुन राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा

माहूर/प्रतिनिधी-नांदेड स्थानिक प्राधिकार मतदारसंघाच्या निवडणुकीत भाजपाचे उमेदवार अमरनाथ राजूरकर यांनी ३३९ मते मिळवत दणदणीत विजय मिळवला. तर प्रतिस्पर्धी कृष्णा आष्टीकर यांना अवघी ८४ मते मिळाली. मात्र या निकालापेक्षा जास्त चर्चा रंगली ती तब्बल २३ मते बाद झाल्याची.

स्थानिक स्वराज्य संस्थांचे प्रतिनिधी म्हणून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींनी मतदान करताना अशी चूक कशी केली, हा आता सर्वसामान्य मतदारांच्या चर्चेचा विषय ठरला आहे. गाव, शहर आणि जिल्ह्याचे प्रश्न सोडविण्यासाठी निवडून दिलेल्या प्रतिनिधींना मतदानाची प्रक्रिया नीट समजली नाही का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. सामान्य मतदार मतदान केंद्रावर जाऊन योग्य पद्धतीने मतदान करतो. मग नगरसेवक, सदस्य आणि लोकप्रतिनिधी म्हणून काम करणाऱ्यांची मते बाद कशी होतात? मतदानपत्रिकेवर योग्य खूण करणे इतके कठीण होते का, असा उपरोधिक सवाल नागरिक विचारत आहेत. राजकीय वर्तुळात तर यावर विनोदांचीही बरसात सुरू झाली आहे. जनतेला मतदान शिकवणारेच मतदानात नापास झाले, अशी टोलेबाजी सुरू आहे. काहींनी तर लोकप्रतिनिधींसाठी मतदानपूर्व प्रशिक्षण वर्ग घ्यावा का? असा उपहासात्मक प्रश्न उपस्थित केला आहे. निवडणुकीत कोण जिंकला आणि कोण हरला हा वेगळा मुद्दा असला, तरी २३ मते बाद होणे ही लोकशाही प्रक्रियेतील गंभीर बाब मानली जात आहे. कारण ही मते सामान्य नागरिकांची नसून, जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकप्रतिनिधींची आहेत. ज्यांना मतदान करता येत नाही, त्यांनी जनतेचे प्रतिनिधित्व नेमके कसे करावे?, त्यामुळे मतदारांमध्ये आता एकच चर्चा रंगली आहे.

# विधान परिषद निवडणुकीतील भाजपच्या विजयाचा कुंडलवाडीत जल्लोष

कुंडलवाडी/प्रतिनिधी-नांदेड जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे उमेदवार अमरनाथ राजुरकर यांनी प्रचंड मताधिक्याने विजय मिळवत विरोधी पक्षाचे उमेदवार आष्टीकर यांचा दारुण पराभव केला. या विजयाचा आनंद कुंडलवाडी शहरात भाजपच्या वतीने उत्साहात साजरा करण्यात आला.



विजयाची घोषणा होताच भाजप कार्यकर्त्यांनी शहरात फटाक्यांची आतषबाजी करत पेढे वाटून जल्लोष केला. यावेळी एकमेकांना शुभेच्छा देत कार्यकर्त्यांनी विजयाचा आनंद व्यक्त केला.या प्रसंगी कुंडलवाडी नगरपरिषद अध्यक्ष प्रतिनिधी गजानन कोटलावार, शैलेश याकावार, नगरसेवक राजेश्वर उत्तरवार, रमेश इरलावार, सचिन कोटलावार, गंगाधर कोटलावार, अमरनाथ कांबळे, संजय पाटील खूळगे तसेच अक्षय गड्डूवार, बंटी ठाकूरवार, सोनू सबनवार, रवी पुपलवार, साई भोरे यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मरखेलमध्ये अल्पवयीन मुलीचा विनयभंग

देगलूर/प्रतिनिधी-देगलूर तालुक्यातील मरखेल येथे १३ वर्षीय अल्पवयीन मुलीचा पाठलाग करून तिचा विनयभंग केल्याप्रकरणी दोन जनाविरुद्ध पोलीस ठाण्यात पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी एका जणास अटक करण्यात आली असून एक जण फरार आहे.

मरखेल पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार दि.१८ फेब्रुवारी ते १६ मे या कालावधीत मरखेल येथील अल्पवयीन मुलीचा आरोपींनी वारंवार पाठलाग केल्याचा आरोप आहे. घरासमोरील सांधित मुलीला अडवून तू आम्हाला का बोलत नाहीस? असे म्हणत तिचा हात धरून जवळ ओढण्याचा तसेच विनयभंग केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे, याप्रकरणी रविवारी दि.२१ जून रोजी रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला. तपासा दरम्यान स.पो.नि.रवी हुंडेकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. त्यानंतर सोमवार दि.२२ जून रोजी दुपारी आरोपी मुस्तफा मगदूम उंद्रीकर याला अटक करण्यात आली. बिलोली येथील जिल्हा व सत्र न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्याला १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली दुसरा आरोपी संदीप बालाजी सुरावर याचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# तीन वर्षापासून जि.प.हायस्कूलमधील गणित,विज्ञान,इंग्रजी विषयाला शिक्षक मिळेनात




## १ जुलैला शाळेला कुलूप ठोकण्याचा इशारा

किनवट/प्रतिनिधी-जिल्हा परिषद हायस्कूल पार्डी-बोधडी खुर्द ही एकेकाळी नावारूपाला आलेली शाळा आज तेवढीच दुर्लक्षित झाली आहे. इयत्ता नववी आणि दहावी या माध्यमिकला शिक्षकं नसून प्राथमिक शाळेचीही वाताहत झाली आहे. पेसा कायद्यांतर्गतच्या शाळेकडे जिल्हा प्रशासनाचे आणि लोकप्रतिनिधींचे अक्षम्य दुर्लक्ष आहे. माहे जून अखेर शिक्षकांच्या जागा न भरल्यास १ जुलै रोजी शाळेला कुलूप ठोकले जाणार असून त्यानंतर नांदेड जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनात शाळा भरविण्याचा गर्भित इशारा शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष देवानंद डुमपल्लू यांनी दिला आहे.

इयत्ता नववी व दहावी या माध्यमिकला गणित, विज्ञान, इंग्रजी आणि समाजशास्त्र या विषयाचे मागिल तीन वर्षांपासून जिल्हा परिषद हायस्कूल पार्डी-बोधडी खुर्द या शाळेला शिक्षकच नसल्याने शिक्षणाचा दर्जा काय असेल ? यात विद्यार्थ्यांचा काय दोष आहे. याला पूर्ण जिम्मेदार नांदेड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाचे जिल्हा शिक्षणाधिकारीच आहेत. तीन वर्षांपासून वारंवार शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्याची मागणी करुनही जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले असल्याचा ठपका पालक आणि विद्यार्थ्यांच्या वतीने शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष डुमपल्लू यांनी ठेवलाय.पेसा कायद्यांतर्गत मोडणारी ही शाळा आहे. माध्यमिकसह प्राथमिक शाळेचीही अवस्था फार वेगळी असेल असे नाही. पटसंख्येच्या तुलनेत पदसंख्या तुटपुंजी आहे. केंद्र व राज्य सरकार बेटी बचाव बेटी पढाव वगैरे वगैरे गोंडस घोषवाक्य देऊन लोकांची फसवणूक करीत असल्याच्या संशयाला लोकांच्या मनात थारा मिळतो. अंमलबजावणीच्या नावे बोंबाबोंब. शिक्षणाच्या बाजारीकरणाच्या विश्वात जिल्हा परिषद शाळांचे अस्तित्व हरवल्याचे दिसते. लोकनेत्यांनाही फारशे जिल्हा परिषद शाळांप्रती अस्मिता असेल यावर प्रश्नचिन्ह निर्माण होताना दिसते. किमान नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.मेघना कावली यांनी तरी शिक्षकांच्या रिक्त जागा भरण्यासाठी या शाळेला प्राधान्यक्रम देऊन शक्य तितक्या लवकर जागा भरुन, शाळेला कुलूप ठोकून मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या दालनात विद्यार्थ्यांची शाळा हलविण्याच्या आंदोलनापासून परावृत्त केल्यास सर्वांच्याच सोयीचे होणार असल्याचे डुमपल्लू म्हणाले.

# जेष्ठ पत्रकार अरुण भंडारे यांचे निधन



किनवट/प्रतिनिधी-सामाजिक कार्यकर्ते तथा जेष्ठ पत्रकार अरुण उर्फ बाळू पारप्पा भंडारे यांचे वयाच्या ६५ व्या वर्षी दीर्घ आजाराने २२ जून रोजी निधन झाले असून आज २३ जून रोजी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी आणि दोन मुले असा परिवार आहे.

किनवट शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील त्यांच्या राहत्या घरी २२ जून २०२६ रोजी पत्रकार भंडारे यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले. बहूआयामी व्यक्तीमत्व होते. न्याय मिळेपर्यंत निर्भीड लिखाणातून प्रकरणाला लाऊन धरत असत. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, पत्नी असा परिवार आहे. २३ जून रोजी सकाळी किनवट ते घोटी महामार्गावरील त्यांच्या शेतात अंत्यसंस्कार पार पडला.

# मौजे डोंगरगाव ग्रामपंचायतीतील ओबीसी आरक्षणाबाबत आक्षेप

## ग्रामस्थांनी निवडणूक अधिकाऱ्यांकडे दिले निवेदन

नांदेड/प्रतिनिधी-नायगाव तालुक्यातील मौजे डोंगरगाव येथील ग्रामपंचायत सदस्यांच्या सोडत पद्धतीने होणाऱ्या आरक्षण प्रक्रियेबाबत ग्रामस्थांनी आक्षेप नोंदवत निवडणूक अधिकाऱ्यांकडे निवेदन सादर केले आहे. गावातील लोकसंख्येच्या प्रमाणात ओबीसी समाजाला योग्य प्रतिनिधित्व मिळावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, मौजे डोंगरगाव ग्रामपंचायतीत एकूण सात सदस्यसंख्या असून २०११ च्या जनगणनेनुसार गावाची लोकसंख्या १०३४ आहे. त्यापैकी नामप्रवर्ग (ओबीसी) समाजाची लोकसंख्या सुमारे ६० टक्के असल्याने या प्रवर्गासाठी केवळ एकच जागा राखीव ठेवण्यात आल्याबद्दल ग्रामस्थांमध्ये नाराजी आहे. गावातील ओबीसी समाजाचे प्रमाण लक्षात घेता या प्रवर्गासाठी दोन सदस्यपदे राखीव ठेवावीत, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच २०११ च्या जनगणनेनुसार व नव्या शासन निर्णयानुसार एकच जागा सोडण्यात येत असल्यास त्याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन आरक्षण प्रक्रियेचा फेरविचार करावा, अशी विनंती करण्यात आली आहे. मागणीची दखल न घेतल्यास ग्रामस्थांकडून तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. हे निवेदन ग्रामपंचायत सदस्य प्रतिनिधी तथा भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे महाराष्ट्र राज्य समिती सदस्य कॉ. देवराव नारे यांनी दिले असून, त्यावर पांडुरंग नारे व जिलानी शेख यांच्याही स्वाक्षऱ्या आहेत. निवेदनाची प्रत तहसील कार्यालय, नायगाव (खु.) येथेही देण्यात आली आहे.

पान १ वरुन

### झोपेचे सोंग घेणाऱ्या सरकारला...

जिल्हाध्यक्ष खा.रवींद्र चव्हाण, उत्तरचे जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे आणि शहराध्यक्ष अब्दुल गफार यांचा पदग्रहण सोहळा सपकाळ यांच्या उपस्थितीत पार पडले. त्यानंतर काँग्रेस पक्षाच्यावतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर भव्य बैलगाडी व ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात मोठ्या संख्येने काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते. यावेळी काँग्रेसच्या एका शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी यांची भेट घेवून मागण्यांचे निवेदन दिले.

### बंडखोर खासदारांच्या ताफ्यासमोर...

विमानतळावर मोठी गर्दी केली होती. या तीनही खासदारांना मतदारसंघात जाण्यासाठी नांदेड ते हिंगोली या मार्गावरुनच जावे लागते. तीन्ही खासदार आपल्या समर्थकांसह वाहनाने जात असतांना महादेव पिंपळगाव पाटी समोर ठाकरे सेनेच्या कार्यकर्त्यांनी वाहनांचा ताफा अडविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे एकच गोंधळ उडाला. ठाकरे सेनेच्या कार्यकर्त्यांनी गद्दार खासदारांच्या विरोधात बॅनर व पोस्टर झळकवून घोषणाबाजी केली. आंदोलन करणाऱ्या शिवसैनिकांची पोलीसांकडून धरपकड सुरु करण्यात आली होती. परंतु शिवसैनिक मोठ्या संख्येने असल्याने पोलीसांचे संख्याबळ कमी होते. त्यानंतर अधिकची पोलीस कुमक मागवून आंदोलन करणाऱ्या शिवसैनिकांना ताब्यात घेण्यात आले. शिवसेना शिंदे गटात प्रवेश करुन मतदारसंघात जाणाऱ्या बंडखोर खासदारांना शिवसैनिकांच्या रोषास सामोरे जावे लागले.

### मान्सून राज्यासह मराठवाड्यात...

झाले होते. मात्र, आता पावसाचा जोर वाढण्याची शक्यता व्यक्त झाल्याने शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.दरम्यान, पावसाअभावी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमधील पाणीसाठा केवळ ८.६८ टक्क्यांवर आला आहे. त्यामुळे पाणी बचतीसाठी मुंबई महानगरपालिकेने विविध निर्बंध लागू केले असून, राज्य सरकारच्या मंजुरीने राखीव पाणीसाठ्याचा वापर करण्याची तयारी सुरू केली आहे. राज्यातील बहुतांश भागात जूनच्या अखेरीस मान्सून पूर्णपणे सक्रिय होण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली असून, आगामी काही दिवसांत पावसाची प्रतीक्षा संपण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

# लढवय्या नेतृत्व हरपले;शामसुंदर केंद्रे पार्डीकर यांचे निधन

किनवट/प्रतिनिधी-सचिन नाईक मित्रमंडळाला राजकारणात उभारी देऊन चर्चेत ठेवण्यात शामसुंदर केंद्रे पार्डीकर यांचा अतीशय महत्त्वाचा वाटा होता. शामसुंदर एक लढवय्या व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांनी स्वतःचा आगळावेगळा ठस्सा उमटवला त्या शामसुंदर केंद्रेंचे २२ जून २०२६ रोजी निधन झाले असून २३ जून रोजी त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



शामसुंदर केंद्रे यांचा सामाजिक आणि राजकारणात सक्रिय सहभाग होता. पुर्वी शिवसेना आणि भाजपा त्यानंतर सचिन नाईक मित्र मंडळाला त्यांनी वाहून घेतले होते. सचिन नाईकांच्या माध्यमातून परवाच राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या नांदेड जिल्हा उत्तरच्या सरचिटणीस पदी नियुक्ती करुन पक्षाने त्यांच्यावर महत्वाची जबाबदारी सोपवली होती. अशा लढवैय्याने जगाचा कायमचा निरोप घेतल्याबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली आहे. वनहक्क दाव्यातून अतिक्रमण धारकांच्या नावे झालेल्या शेतजमीनीवर वनविभागाने अतिक्रमण हटाव मोहिम चालविली त्या त्यावेळी केंद्रे यांची महत्त्वाची भूमिका होती.

# मौजे ब्रम्हपुरी गोदावरी नदीच्या पात्र परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

नांदेड/प्रतिनिधी-मौजे ब्रम्हपुरी येथील गोदावरी नदी पात्र परिसरात शांतता व सुव्यवस्था अबाधीत रहावी यासाठी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील नदी पात्रातील परिसर प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून २३ जून रोजीचे ६ वाजेपासून ते २२ जुलै रोजीचे मध्यरात्री पर्यंत घोषित करण्यात आले आहे. त्याबाबत पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी आदेश निर्गमित केले आहेत.

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन वादग्रस्त जागा, ज्याची चतु:सिमा पूर्वेस वाजेगाव कोल्हापुरी बंधारा, पश्चिमेस नांदेड ते देगलूरकडे जाणाऱ्या रोडवरील जुना पूल, दक्षिणेस गोदावरीचे नदीचे पात्र आणि उत्तरेस चिल्ला/दर्गाची संरक्षण भिंत यामधील जागा २३ जून रोजी सकाळी ६ वाजेपासून ते २२ जुलै रोजीच्या मध्यरात्री पर्यंत भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे प्रतिबंधीत क्षेत्र म्हणून पोलीस अधीक्षक यांनी घोषित केले आहे.हा आदेश शासकीय कर्तव्यावरील अधिकारी व कर्मचारी तसेच ज्यांना जिल्हाधिकारी नांदेड व पोलीस अधीक्षक नांदेड यांनी परवानगी दिली अशा व्यक्तींना लागू राहणार नाही.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com मो.९४२२१७४७७४